## महासचिवांचा अहवाल

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२०

प्रिय वाचक मित्रहो सन २०१९—२०२० या वर्षाच्या महासचिवांचा अहवाल आपल्या हाती देताना मला विलक्षण आनंद होत आहे. कारण संस्थेने वर्षभरात जे यश मिळविले आहे त्याचे आपण देखील कळत नकळत वाटेकरी आहात. आणी आपण दिलेल्या सहभागामुळेच संस्थेला ऐका विशिष्ट उंची पर्यंत कार्य करता आले. २०१९. २० या वर्षात संस्थेने उपक्रम कमी राबविले मात्र जे राबविले ते प्रशंसनीय आहे. असे मला वाटते. अगदी ठळक नमुद करायचे झाल्यास दक्षिण कोरीयातील डॉटमिनी कंपनी बरोबर झालेला करार व इयत्ता १०वी ची ब्रेल लिपीतील गाईडचे प्रकाशन वरील दोन्ही उपक्रमांद्वारे संस्थेला थेट महाराष्ट्रातील अंध शाळांपर्यंत पोहचता आले. या सर्व उपक्रमांची विस्तृत माहीती आपल्याला अहवालात वाचायला मिळेलच.  बाकी उपक्रम खाली नमुद केलेले आहेत.

**अंधांच्या झटपट बुद्धीबळ स्पर्धा उत्साहात संपन्न** — १३ व १४ एप्रिल २०१९ रोजी हया वर्षातील पहिला उपक्रम अहमदनगर येथील शांतीकुमार मेमोरीयल ट्रस्ट यांच्या संयुक्त विदयमाने लक्ष्मी नारायण मंगल कार्यालय, स्वस्तिक चौक, या ठिकाणी संपन्न झाला. या स्पर्धेला सबंध राज्यातुन ६२ खेळाडु सहभागी झाले. खरे तर स्पर्धा अधांची होती परंतु बुदधी बळ हा खेळ असा आहे कि, अंध व डोळस लोक एकत्रित खेळु शकतात व आपल्या गुणवत्तेच्या जोरावर ते डोळस व्यक्तीला हरवु शकतात म्हणुनच स्पर्धेचे राउंड झाल्यावर नगरमधील डोळस १० बुद्धीबळ पटटु व स्पर्धेतील प्रथम १० याच्यांत  एक राउंड  खेळविण्यात आला. या राउंडमध्ये काही अंध व्यक्तींनी डोळस व्यक्तींबरोबर सामना जिंकला. या स्पर्धेचा पारीतोषिक वितरणाचा समाारंभ दि. १४ एप्रिल रोजी ठिक ४ वाजता अहमदनगर शहरातील नामांकित उदयोजक व स्पर्धेचे करता करविता मा. नरेंद्र फिरोदिया व प्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ. प्रकाश कांकरीया यांच्या उपस्थित संपन्न झाला. यावेळी श्री. नरेंद्र फिरोदिया यांनी स्पर्धकांचा उत्साह बघुन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. अंध व्यक्ती ही उत्तम प्रकारे बुद्धीबळ खेळतात हे ही प्रथम त्यांनी बघितले. राष्ट्रीय स्तरावर सुदृधा आपण हया स्पर्धा घेवु अशी त्यांनी ग्वाही दिली. यावेळी डॉ. कांकरीया यांनी देखील आपल्या मनोगतातुन हा अगळावेगळा उपक्रम अहमदनगर शहरात घेतला म्हणुन आयोजकांना धन्यवाद दिला. व चांगल्या उपक्रमांकरीता आम्ही नेहमी आपल्या सोबत असू असे अश्वासन दिले. या स्पर्धेत मिलिंद सामंत याने प्रथम क्रमांक पटकविला तर द्वितीय क्रमांकाची मानकरी वैशाली सालवकर ही ठरली व तृतीय क्रमांकाचे बक्षिस अतुल देशमाने याने मिळविले.  विजेत्या स्पर्धकांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम देवुन गौरविण्यात आले. सहभागी स्पर्धकांना शांतीकुमार ट्रस्टच्या वतीने उत्तेजनार्थ चे बक्षिस देण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता संस्थेचे अध्यक्ष अरूण भारस्कर व सौ. सपना चांडक आणि फिरोदिया ट्रस्टचे आशुतोष घाणेकर व उमेश गांधी यांनी परीश्रम घेतले.




१. **विवाह सोहळा व शैक्षणिक साहित्य वाटप उत्साहात संपन्न :—** अंध दाम्पत्यांचा विवाह सोहळा हा उपक्रम गेल्या १२ वर्षांपासुन संस्थेच्या वतीने सातत्याने राबविण्यात येत आहे. बारा वर्षांच्या कालावधीत संस्थेने जवळ जवळ ३० अंध दाम्पत्यांचे संसार उभे करून त्यांना वैवाहिक जीवन जगण्याचा आनंद मिळवुन दिला. त्यांना ही डोळस माणसांप्रमाणे संसार करण्याचा हक्क आहे हे संस्थेने सिदृध करून दिले आहे.

   या वर्षी सुद्धा रविवार दि. ७ जुलै २०१९ रोजी श्रीकृष्णा लॉन्स पुना रोड नाशिक येथे संस्थेच्या संचालिका प्रतिभाताई होळकर यांनी पुढाकार घेवुन दोन अंध दाम्पत्यांचा विवाह लावुन दिला. सोनाली सुरोसे, राजेंद्र पाटील व नाजिमा शेख, अब्दुल दस्तगीर हि दोन अंध दाम्पत्य उपस्थित मान्यवरांच्या आर्शिवादाने व साक्षीने विवाह बद्ध झाले. या विवाहितांना मराठा मुद्रा महिला मंडळ यांच्या वतीने संसारपयोगी सर्व वस्तु देण्यात आल्या. याच कार्यक्रमात देखील गरजु ८०अंध व्यक्तिंच्या पाल्यांना शैक्षणिक साहित्याचे ही वाटप करण्यात आले. हयामधे पाणी बोटल व शालेय वस्तुंचा समावेश होता.

   सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणुन नाशिक महापलिका आयुक्त राधाकृष्ण गमे, आमदार देवयानी फरांदे, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा चे उपाध्यक्ष हिरामण आहेर व नाशिकचे उदयोजक अजित बने व मराठा मुद्रा महिला मंडळाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होत्या. आपल्या मनोगतात आमदार देवयानी फरांदे म्हणाल्या कि दिव्यांगांसाठी १७ कोटी रूपयांचे अनुदानाचे टेंडर महापालिकेकडे पास करण्यात आले असुन यातुन दिव्यांगांसाठी प्रशिक्षण केंद्र लवकरच सुरू करण्यात येणार आहे. असे उपक्रम मोठया प्रमाणात राबविण्यात आले पाहिजे , तर राधा कृष्ण गमे यांनी आपले मत व्यक्त करताना ते म्हणाले कि, शासनाचा दिव्यांगांसाठी ५

टक्के निधी राखीव असुन तो पुरेपुर खर्च व्हावा म्हणुन महापालिकेतर्फे दिव्यांगांना रोजगार संधी निर्माण करणारे प्रशिक्षण, कार्यशाळा, मार्गदर्शन शिबिरे घेवुन शासनांच्या योजनांचा मोठया प्रमाणावर लाभ मिळवुन देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करू. आरंभी मानद अध्यक्षा कल्पना पांडे यांनी प्रास्ताविक सादर केले. अध्यक्ष अरूण भारस्कर यांनी संस्थेच्या उपक्रमांची माहिती दिली. तर कार्यक्रमाचा संपुर्ण खर्च संस्थेच्या संचालीका प्रतिभा होळकर व मराठा मुद्रा महिला मंडळाने केला. आलेल्या सर्व पाल्यांना शालेय वस्तुंचे वितरण करून दोन जोडप्यांना संसारापयोगी वस्तु देवुन कन्यादानाचे पुण्यही या मंडळाने घेतले. मयुर ज्वेलर्स व उदयोजक अजित बने यांचेही या उपक्रमास सहकार्य लाभले. यावेळी महिला मंडळाच्या सर्व पदाधिकारी उपस्थित होत्या. या उपक्रमा करीता विजया दबे व सौ. सपना चांडक यांनी परीश्रम घेतले.




२. **<u>शिष्यवृत्ती वितरण सोहळा संपन्न</u>** — दरवर्षी संस्थेच्या वतीने गरजु व गुणवंत अंध विदयार्थ्यांच्या शिक्षणास प्रोत्साहन मिळावे म्हणुन संस्थेच्या वतीने शिष्यवृत्ती देण्यात येते. ज्यामुळे त्या रकमेचा उपयोग त्यांना त्यांच्या शिक्षणाकरीता होतो, हि संस्थेची धारणा आहे. म्हणुनच गेल्या १२ वर्षापासुन सदर उपक्रम संस्थेने अखंडित पणे सुरू ठेवला आहे. या वर्षी शनिवार दि. १३ जुलै २०१९ रोजी मुंबई येथील इस्लाम जिमखाना येथे १२२ अंध विदयार्थ्यांना प्रत्येकी १५००/— रू. रकमेचे शिष्यवृत्तीचा धनादेश वितरीत करण्यात आला. यावेळी अंत्योदय प्रतिष्ठान व लायन्स रमाशंकर झंवर यांच्या पुढाकाराने मुंबईमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर अंत्योदय प्रतिष्ठानचे सर्वेसर्वा आमदार प्रसादजी लाड व ३२३१—ए लायन्स क्लबचे डिस्ट्रीक गव्हर्नर कमलेशजी दलाल, लायन्स क्लब वाळकेश्वर, मुंबादेवी ट्रस्ट, लायन्स क्लब ऑफ चर्चगेट व मिलिनियमचे सर्व अध्यक्ष उपस्थित होते. यावेळी शिष्यवृत्तीचे धनादेश प्रत्येक विदयार्थ्याला मान्यवरांच्या हस्ते दंण्यात आले.

यावेळी श्री लाड यांनी आपल्या मनोगतातुन सर्व शिष्यवृत्ती धारक विदर्यार्थ्यांचे कौतुक केले. हि योजना संस्थेने अखंडितपणे चालु ठेवावी, अंत्योदय प्रतिष्ठान स्तुत्य उपक्रमांसाठी संस्थेच्या पाठीशी उभे राहिल यांची ग्वाही दिली. तर लायन्स क्लब नेहमी संस्थेला सहकार्य करेल. संस्थेने चांगले उपक्रम सुचवावेत व सदरचा उपक्रम शासनाचे कोणतेही अनुदान नसतांना देखील संस्था अखंडितपणे राबविते याचे कौतुक डिस्ट्रीक गव्हर्नर कमलेशजी दलाल यांनी केले. यावेळी लायन्स क्लब च्या वतीने ६० अंध विदयार्थ्यांचा शिष्यवृत्तीचा धनादेश संस्थेला सुपुर्द केला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता संस्थेच्या कोषाध्यक्षा विजया दबे, सौ. सपना चांडक, महासचिव दत्ता पाटील, इस्लाम जिमखान्याचे हानिफ शेख यांनी परीश्रम घेतले.



३. **<u>गुणगौरव कार्यक्रम संपन्न</u>** :— चांगले काम केल्यास प्रत्येकाला वाटते कि शाबासकी मिळावी म्हणुन किवा कौतुकाची थाप दिल्याने काहीसा आत्मविश्वास देखील वाढतो. म्हणुनच काही विदयार्थी वर्षभर अभ्यास करून उत्तम गुण संपादन करतात. परंतु काही विदयार्थ्यांची कदरही होत नाही, म्हणुन अशा वंचित विदयार्थ्यांचा शोध घेउन संस्थेच्या वतीने गुणगौरव कार्यक्रमाचे आयोजन दरवर्षी करण्यात येते, व पाहुण्यांच्या हातुन अशा विदयार्थ्यांचे कौतुक करून त्यांना झोतात आणण्याचा प्रयत्न संस्थेच्या वतीने मागील १२ वर्षापासुन होत आहे. खरेतर आपल्या पाल्याने अंध असतानाही किती गुण मिळविले हे पालकांनी देखील बघायला हवे अशी संस्थेची देखील इच्छा

असते. पण काही कारणास्तव जे पालक येत नाही ती उणीव भरून काढण्याकरीता अनेक सामाजिक कार्य करणा—या सेवाभावी संस्थाना या कार्यक्रमाचे आमंत्रण दिले जाते. किंबहुना त्यांच्या सोबत हा कार्यक्रम एकत्रित रित्या आयोजित केला जातो, जसे जैन सोशल प्लॅटीनम ग्रुप किंवा रोटरी क्लब सारख्या संस्था यांची अधिक मदत होते. व एकत्रित कार्यक्रम असल्याने त्यांचे देखील अनेक सभासद हजर राहतात. ज्यामुळे अंध व्यक्तींची क्षमता त्यांच्यापर्यंत पोहचते व समाज जागृतीही होते. यावेळी संस्थेच्या वतीने अनुक्रमे नाशिक व ठाणे येथे गुणगौरव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

२५ ऑगस्ट २०१९ रोजी नाशिक येथील श्रीकृष्णा लॉन्स येथे जैन सोशल प्लॅटीनम ग्रुपच्या विदयमाने हा कार्यक्रम आयोजित केला गेला. यावेळी मंचावर निमाचे अध्यक्ष शशी जाधव, आमदार बाळासाहेब सानप, जैन सोशल प्लॅटीनम ग्रुपच्या अध्यक्षा व किरण खाबिया, जॉगिंग क्लबचे अजय गुप्ता व अनेक मान्यवरांच्या उपस्थित हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मुंबई ठाणे वगळता उर्वरीत महाराष्ट्रातील १३९ विदयार्थ्यांचा सत्कार उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विदयार्थ्यांना रोख रक्कम पांढरी काठी व अट्टल विश्वास काव्यसंग्रह भेट म्हणुन देण्यात आला. आपल्या मनोगतात आमदार बाळासाहेब सानप यांनी उत्तम गुण संपादन केलेल्या इयत्ता १० वी ते पोस्ट ग्रॅजुएट झालेल्या अंध विदयार्थ्यांचे कौतुक केले व अंध असुनही त्यांच्या मध्ये शिकण्याची असलेली धडपड पाहुन त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. ते म्हणाले कि, आपण डोळे नसणा—या या विदयार्थ्यांना एवढे चांगले गुण मिळु शकतात! हे तर डोळस असणा—या विदयार्थ्यां करीता व समाजा पुढे एक आदर्श आहे. जी मुले मार्क कमी पडण्याच्या धाकाने आत्महत्या करतात त्यांनी हया अंध मुलांचा आदर्श नेहमी डोळयापुढे ठेवावा. निमाचे अध्यक्ष शशी जाधव व जॉगिंग क्लबचे अजय गुप्ता यांनी देखील १० वीत चांगली टक्केवारी मिळवलेल्या मुलांचे कौतुक करून त्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. संस्थेचा परीचय व उपक्रमांची माहिती अध्यक्ष अरूण भारस्कर यांनी दिली. मानद अध्यक्षा कल्पना पांडे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले तर कार्यक्रम घेण्याचा उद्देश उपाध्यक्ष व्ही. बी. गायकवाड यांनी विशद केला. या कार्यक्रमाकरीता संस्थेच्या कोषाध्यक्षा विजया दबे, सौ. सपना चांडक यांनी परीश्रम घेतले.

अशाच पद्धतीचा कार्यक्रम रोटरी क्लब ऑफ हिरानंदानी यांच्या विषेश पुढाकाराने ८ स्पटेंबर २०१९ रोजी एन. के. टी. कॉलेज ठाणे येथे उत्साहात साजरा झाला. विषेश म्हणजे मुसळधार पाउस असताना देखील मोठया संख्येने विदयार्थी मुंबई — ठाणे व पुणे येथुन उपस्थित होते. श्री. हिरानंदानी क्लबच्या अध्यक्षा नम्रता श्रीवास्तव व प्रदिप ठाकुर यांनी विशंष परीश्रम घेवुन हा कार्यक्रम आयोजित केला. व कार्यक्रमाला लागणारा संपुर्ण खर्च हिरानंदाणी क्लबच्या वतीने देण्यात आला. ज्यामुळे संस्थेला अन्य कोणाकडे मदत मागण्याची गरज पडली नाही. आणि संस्थेला सुद्धा कोणताही आर्थिक ताण पडला नाही. यावेळी विदयार्थ्यांना रोख रक्कम पांढरी काठी, पेन ड्राईवह, व इंग्रजी व्याकरणाचे पुस्तक भेट म्हणुन देण्यात आले. या कार्यक्रमाला ९० अंध विदयार्थ्याचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला रोटरीच्या अध्यक्षा नम्रता श्रीवास्तव यांनी जाणीवपुर्वक अन्य क्लबचे रोटरी सदस्य व ठाण्यातील प्रतिष्ठीत व्यक्तींना यशवंत विदयार्थ्यांचे कौतुक करण्यास आमंत्रित केले होते व याच कार्यक्रमात सौ. रिटा व्होरा व नामदेव भालेराव या अंध शिक्षकांना आदर्श शिक्षक म्हणुन सन्मानित करण्यात आले. दोन्ही कार्यकमाच्या वेळी आलेल्या विदयार्थ्यांना प्रिती भोजनाची व्यवस्था करण्यात आली. याच कार्यक्रमात विदयार्थ्यांना स्कॉलरशिप चे फॉर्म पण वाटण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता विजया दबे व दिनेश मुसळे यांनी परीश्रम घेतले.

४. **ब्रेल गाईड प्रकाशन सोहळा** — अंध मुलांच्या शिक्षणासाठी संस्था नेहमी कार्यरत असते. दरवर्षी काही ना काही नविन प्रकल्प राबवुन अंध मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणुन प्रयत्नही करत असते. या वर्षी संस्थेने इयत्ता १० वी च्या मुलांची टक्केवारी वाढावी व त्यांना अभ्यासक्रम सोपा जावा म्हणुन संस्थेने १० वी चे गाईड ब्रेल मधुन छापली यासाठी कोटक महींद्रा बॅकेने आर्थिक सहकार्य केले. ११ सप्टेंबर २०१९ रोजी मुंबई बांद्रे येथील स्पेस्टीक सोसायटी येथे तात्कालीन शिक्षणमंत्री आशिष शेलार व कोटक महिंद्रा बॅकेचे अधिकारी यांच्या हस्ते ब्रेल गाईडचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्रातील सर्व अंध शाळेच्या प्रतिनिधींना आमंत्रित करण्यात आले व मंत्री महोदयांच्या हस्ते वितरीत केले. तसेच याच कार्यक्रमात महाराष्ट्रातील १५ अंध शाळेंच्या आदर्श शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. आपल्या मनोगतात आशिष शेलार यांनी सरकारचे कोणतेही अनुदान नसताना देखील संस्थेने १० वी च्या अंध मुलांकरीता ब्रेल मध्ये गाईड छापले याबद्दल संस्थेचे कौतुक केले व संस्थेला १ ब्रेल प्रिंटर देण्याचे आश्वासन दिले. २३ पुस्तकांचा १ सेट ज्या एका सेटची किंमत जवळजवळ ६५००/— एवढी आहे. पण संस्थेच्या वतीने व महिंद्रा कोटकच्या मिळालेल्या सहकार्याने हि पुस्तके महाराष्ट्रातील सर्व अंध शाळेंना विनामुल्य वितरीत करण्यात आली. शाळामार्फत आलेल्या मागणी अर्जानुसार जवळजवळ ३५० सेट देण्यात आले. हा आमचा उपक्रम सर्व अंध शाळांसाठी म्हत्वाचा ठरला. शाळांच्या मुख्याध्यापकांनी आमच्या संस्थेच्या या उपक्रमाची स्तुती केली व आभार ही व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अध्यक्ष अरूण भाररूकर यांनी केले. व संस्थेचा परीचय मानद अध्यक्षा कल्पना पांडे यांनी करून दिला. आभार प्रदर्शन संस्थेचे सन्मानीय सदस्य हिरामण आहेर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता महासचिव दत्ता पाटील, संस्थेच्या कोषाध्यक्षा विजया दबे, सौ. सपना चांडक, नामदेव शेंडगे, वाल्मिक भडांगे यांनी परीश्रम घेतले.

४ न.





५. **<u>ब्रेल डॉट मिनी डिव्हाइसः—</u>**

आज पर्यंत संस्थेने अंधांकरीता शिक्षण, क्रिडा व स्वावलंबनाकरीता मागील १२ वर्षांत अनेक विविध उपक्रम राबविले. मात्र त्याही पलीकडे जाउन दृष्टीहिन बांधवांकरीता बदलत्या युगाला अनुसरूण भरीव व टिकावु काम करण्याचा संस्थेनी प्रयत्न केला, जसे गेल्या वर्षात म्हणजेच मार्च २०१९ मध्ये संस्थेने प्रथमच महाराष्ट्राबाहेर क्रिडा महोत्सवाचे आयोजन केले होते. तसेच या वर्षी देखील संस्थेने देशा बाहेर जावुन अंधां साठी त्यांचे शैक्षणिक व अवांतर वाचनाचे ज्ञान मिळण्याकरीता देखील प्रयत्न केला. निमित्त होते ते दक्षिण कोरीयाच्या डॉट इन कार्पोरेशन या कंपनीने विकसित  केलेल्या ब्रेल डॉट मिनी उपकरणाचे. या उपकरणात ऑडिओ मेमरी, शालेय पुस्तकाचे वाचन, संगीत, जनरल नॉलेज व कथा हे सर्व अंध व्यक्ती, विदयार्थी यांना सहज ब्रेल लीपी मध्ये किंवा ऑडिओ माध्यमातुन समजेल असे बनविले होते. ते कंपनीला आपल्या देशातील अंध व्यक्तींना व विदर्यार्थ्यांना प्रसार करून वितरीत करावयाचे होते. पण याकरीता त्यांना ब्रेल अवगत असलेल्या व अंधांकरीता काम करत असलेल्या आपल्यासारख्या संस्थेची गरज होती. म्हणुन कोरीया देशातील डॉट इन कार्पोरेशन या कंपनीकडुन संस्थेबरोबर करार करण्यात आला. त्या करारान्वये महाराष्टातील अंध शाळांमध्ये त्या डिव्हाइस चे प्रात्याक्षिके दाखवुन विदयार्थ्यांना शिक्षणासाठी ते किती उपयुक्त आहे याची माहिती देवुन वितरीत करावे. सध्याच्या स्थितीतील इंग्रजी, स्पेन जपान कोरीयन अशा विविध मोजक्या ११ भाषेत ते डिव्हाइस होते, ३ ऑगस्ट २०१९ रोजी डिव्हाइस चे प्रात्याक्षिके संस्थेच्या कार्यालयात कोरीयाच्या डॉट मिना कंपनीच्या डायरेक्टर अहरूम चोही यांनी कमिटी मेंबरर्सला दाखविण्यात आली. हे उपकरण ३री पासुन ते अगदी वृद्ध माणसांपर्यंत कोणीही हाताळु शकते, व अंध शाळांना याची प्रात्याक्षिके दाखवयाची असल्यास व भारतातील दृष्टीहिन व्यक्तींच्या उपयोगात आणायचे असल्यास हिंदी व मराठी भाषा देखील डिव्हाईस मध्ये आवश्यक आहे, हि उणीव मात्र आमच्या अध्यक्षांना जाणवु लागली. आणि हे सर्व समजुन घेणे व अंध व्यक्तीना समजुन सांगणे हे संस्थेपुढे फार मोठे आव्हान होते, त्याकरीता संस्थेने संपुर्ण महाराष्ट्रातील अंध शाळांना भेटी दिल्या व शाळेच्या प्रत्येक शिक्षकांना या उपकरणाबद्दल माहिती व डेमो देउन विदयार्थ्यांना हि शिक्षण देण्याचे सांगितले. नाशिक मधील के. टी. एच. एम. या कॉलेज ने पण आम्हाला सहकार्य केले, संस्थेचे उपाध्यक्ष  व्ही. बी. गायकवाड यांनी सुदधा या उपक्रमात आपला सहभाग नोंदविला. पण प्रत्येक काम केले व ते किती यशस्वी झाले याचा अभ्यास संस्थेचे अध्यक्ष अरूण भारस्कर जरा बारकाइनेच करत असतात. त्यांनी कोरीयाच्या डिव्हाइस चे ज्ञान किती शाळा व तेथील शिक्षकांना समजले हे जाणुन घेण्यासाठी संपुर्ण महाराष्ट्रातील अंध शाळांना भेटी देवुन सांगितलेल्या उपक्रमावर डॉट मिनी डिव्हाइस च्या ४ चाचण्या घेण्यात आल्या. व त्यांची सरासरी गुणांची टक्केवारी काढण्यात आली. हा सर्व अहवाल संस्थेने कोरीयाच्या डॉट इन कार्पोरेशन कंपनीला ही पाठविला. शिकण्याच्या बाबतीत तर अंध मुले व शिक्षकही कुठे कमी पडले नाही, पण या अंध शाळांना व भारतातील दृष्टीहिन व्यक्तींना डिव्हाइस वापरात आणावयाचे झाल्यास त्यामध्ये हिंदी व मराठी भाषा देखील असणे जास्त गरजेचे भासु लागले. कारण सर्वच काही इंग्रजी शिकलेले नसतात. म्हणुन संस्थेने कंपनीला हे डिव्हाइस मराठी व हिंदी भाषेत बनविण्याची विनंती कंली व यासाठी संस्था त्यांना मदत करेल, त्याकरीता आयटी क्षेत्रातील इंजिनिअर उपलब्द करून दिला. शिवाय संस्थेने यात पुढाकार घेवुन ब्रेल मराठी व हिंदी अनुकरण असलेली डॉट मिनी डिव्हाइस हाताळण्याची माहिती पुस्तीका व त्यामध्ये असणा—या बटणांची माहिती असलेले ब्रेल क्लारूम म्हणुन ब्रेल पुस्तक तयार करून छापले. व हया पुस्तकाच्या प्रति महाराष्ट्रातील सर्व अंध शाळांना विनामुल्य देण्यात आल्या. याचबरोबर ब्रेल डॉटमिनीचे १५० डिव्हाइस सुद्धा महाराष्ट्रातील सर्व अंध शाळांना विनामुल्य वितरीत करण्यात आले. एका डिव्हाइस ची किमत भारतीय चलनानुसार ३५०००/— एवढी होती. हा उपक्रम जवळजवळ ऑगस्ट २०१९ ते १० नोव्हेंबर २०१९ पर्यंत चालु होता. या उपक्रमाकरीता के. टी. एच. एम. या कॉलेज मधील काही अंध विदयार्थी व संस्थेचे अध्यक्ष अरूण भारस्कर, उपाध्यक्ष व्ही. बी. गायकवाड, मुंबईच्या दादर अंध शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा जाधव व सपना चांडक यांनी परीश्रम घेतले.

भविष्यात ब्रेल डॉट मिनी हया डिव्हाइस मध्ये असलेली भाषेची कमतरता व काही किरकोळ उणीवा भरून काढुन ती सर्व प्रकारच्या अंध व्यक्तींना अगदी सुलभ पणे हाताळता येतील हा संस्थेचा प्रयत्न राहिल. व त्या दिशेने ही संस्था वाटचाल करत आहे.

६. **<u>पांढरी काठी व दिवाळी फराळाचे वाटप उत्साहत संपन्न :—</u>** खरे तर १५ ऑक्टोबर हा दिवस युनाइटेड नेशन्स ऑर्गनाइजेशन च्या आदेशानुसार संबंध जगभर पांढरी काठी दिन म्हणुन साजरा करण्यात येतो. परंतु विधानसभा निवडणुका व परीक्षा कालावधी लक्षात घेवुन तसेच दिवाळी सण देखील जवळ असल्याने हा कार्यक्रम एकत्रित घेण्यात आला. सदर कार्यक्रम धनत्रयोदशीचे अवचित्य साधुन २५ ऑक्टोंबर २०१९ रोजी लायन्स क्लब हॉल पंडित कॉलनी नासिक येथ दुपारी १२.०० वाजता लायन्स क्लब कॉर्पोरेट नाशिक यांच्या सौजन्याने उत्साह वर्धक वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाला नाशिक विभागातुन १३९ अंध बांधव मोठया संख्येने उपस्थित होते. प्रत्येक व्यक्तीस पांढरी काठी, दिवाळी फराळ व संस्थेचे संचालक अर्जुन मुदृदा यांच्या पुढाकाराने अंध बांधवांना रेमण्ड चे शर्ट पीस व पॅन्ट पीस व अनिल नहार यांच्या पुढाकाराने अंध भगिनिंना साडया देण्यात आल्या व याच कार्यक्रमात राजु गांगुर्डे व नामदेव हयाळीज यांना लायन्स क्लब कार्पोरेट नाशिक चे राहुल शहा व मुकुंद कुरूमभटटी यांच्या सहकार्याने मजबुत सहा बाय सहा चे स्टॉल देण्यात आले ज्यांची किंमत प्रत्येकी ४५०००रु एवढी आहे. अजय गुप्ता यांच्या पुढाकाराने राजु गिते व गोपाळ पाडेवार यांना व्यवसायाकरीता अगरबत्ती देण्यात आली. याच कार्यक्रमात आदित्य भागवत, नेहा म्हस्के , राजु गांगुर्डे, राजु कोठावदे, वैष्णवी क्षीसागर, दत्तु को—हाळे, अर्चनासिंग, रूक्मीणि बडसल आणि पुष्पा शेवरे अशा ११ अंध लोकांना दिवाळी निमित्त शिधा वाटप करण्यात आला. त्याकरीता संस्थेचे हितचिंतक सौरभ शहा यांनी विशेष योगदान दिले किंबहुना हे त्यांच्यामुळेच शक्य झाले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. शिवाय याच कार्यक्रमात १० अंध विदयार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण ही करण्यात आले.

आरंभी दिवाळी सण असल्याने हळुवार मंगलमय गाण्याचे सुर कानावर येत होते. सगळीकडे आंनदाचे वातावरण, दिव्यांची माळ व आकाश कंदील आणी इंद्रधनुच्या सप्तरंगानी भरलेली रांगोळी हे कार्यक्रमाच्या सजावटीचे मुख्य आकर्षण ठरले. प्रमुख पाहुणे म्हणुन आलेल्या महिंद्रा लॉजिस्टीक निंबा भामरे, मॅनेजर प्रसाद नाईक लॉयन्स क्लब ऑफ नाशिक कार्पोरेटचे अध्यक्ष राजु व्यास झोनल चेअरमन सुनील पाटील व अन्य पदाधिकारी यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले. दिवाळीची गाणे गाउन कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली. दिवाळी सण प्रत्येकाचा आनंदी जावा म्हणुन दिवाळी फराळ व मिठाई सोबत पुरूषांना ड्रेस, महिलांना साडी व पांढरी काठी यांचे वाटप करण्यात आले.

महिंद्रा लॉजिस्टीक निंबा भामरे, मॅनेजर प्रसाद नाईक यांनी सर्व अंध दांम्पत्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या व संस्था जे उपक्रम राबविते त्याचे भरभरून कौतुक केले व संस्थेचे चांगले उपक्रम नेहमीच अंधाच्या जिवनात एक चैत्यन्य निर्माण करून देते. असे उपक्रम रावविण्यासाठी महिंद्रा कंपनी नेहमी त्यांना मदत करीत राहिल.लायन्स क्लब ऑफ नाशिक कार्पोरेट चे अध्यक्ष राजुभाई व्यास झोनल चेअरमन सुनील पाटील यांनी संस्थेच्या वतीने राबविण्यात येणा—या नेत्रदान शिबिरात लायन्स क्लब ऑफ नाशिक कार्पोरेट आपल्या बरोबर राहील याची ग्वाही दिली व दिवाळी निमित्ताने अंध बांधवांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अध्यक्ष अरूण भाररूकर यांनी केले. व संस्थेचा परीचय मानद अध्यक्षा कल्पना पांडे यांनी करून दिला. पाहुण्यांचे आभारप्रदर्शन कोषाध्यक्षा विजया दबे यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता सौ. सपना चांडक, व दिनेश मुसळे व लायन्स गायत्री कोष्टी यांनी विषेश परीश्रम घेतले.

७. **<u>राज्यस्तरिय क्रिकेट स्पर्धा नाशकात संपन्न</u> :—** अंध व्यक्तींच्या अंतरंगात देखील एक खेळाडू वृत्ती व सुप्त गुण दडलेले असतात. ज्यांना गरज असते ती फक्त संधीची आणि प्रोत्साहन देण्याची, त्यांच्या याच भावनेची दखल घेवुन संस्था दरवर्षी विविध खेळांच्या स्पर्धेचे आयोजन करत असते. व अंध खेळाडु देखील या संधीची जणु काही वाटच पाहतात. या वर्षी राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धा सलग १३ व्या वर्षी नाशिक येथील छत्रपती शिवाजी स्टेडिअम हायस्कुल ग्राउंड २४ व २५ डिंसेबर २०१९ रोजी लॉयन्स क्लब ऑफ नाशिक कार्पोरेट व दि ब्लाइंड वेलफेअर ऑर्गोनाइझेशन यांच्या संयुक्त विदयमाने आयोजित करण्यात आल्या.

या सपर्धेचे उदघाटन नाशिक मतदार संघाचे खासदार श्री. हेमंत गोडसे, नाशिक जिल्हा क्रिडाधिकारी रवि नाईक व लायन्स क्लब चे पदाधिकारी यांच्या उपस्थित सपन्न झाले. उदघाटन प्रसंगी अंध खेळाडु मध्ये विषेश चैतन्य निर्माण व्हावे म्हणुन बॅडच्या तालावर खेळाडुंनी संचलन करून मान्यवरांना मानवंदना दिली. तर महाराष्ट्र संघाचा कर्णधार प्रशांत जगताप व अंध अंतरराष्टीय क्रिकेट खेळाडु अमोल कर्चे याने पेटती मशाल घेवुन संचलनाचे नेतृत्व केले. खासदार गोडसे यांनी हवेत बलुन सोडुन स्पर्धेचे औपचारीक उदघाटन केले व त्यांनी खेळाडुना उत्तम प्रकारे खेळ खेळुन चषके जिंकण्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी श्री.

६ न.

रवि नाईक यांनी खेळाडुंना खेळाडुवृत्तीने खेळण्याची व शिस्तपालनाची शपथ दिली. तर हेमंत गोडसे व अध्यक्ष अरूण भारस्कर, लायन राजुभाई व्यास यांनी आपली खेळकर वृत्ती दाखवुन प्रत्येकी एक चेंडु मारून अंध खेळाडुंना प्रोत्साहन देत आपण त्यांच्या सोबत असल्याची जाणीव करून दिली.

या स्पर्धेकरीता संबंध राज्यातुन ८ विभागातील संघ ज्यामध्ये नागपुर, अमरावती, नांदेड, मराठवाडा, नाशिक, मुंबई, पुणे व कोल्हापुर संघ सहभागी झाले होते. सदर स्पर्धा बाद फेरिने खेळविण्यात आली असुन पहिला सलामीचा सामना अ गटात नाशिक व पुणे आणि ब गटात कोल्हापुर व विदर्भ संघात झाला. हि स्पर्धा दोन गटांत आयोजित करून बाद फेरीने खेळविण्यात आली. अतिंम सामना विदर्भ आणि शेष महाराष्ट्र या संघात झाला, हा सामना बघण्यासाठी उपस्थित प्रेक्षक समुहाबरोबर नाशिक मधील कॅंब्रिज शाळेचे विदयार्थी व शिक्षकवृंद देखील अतिशय उत्साहाने सामन्याचा आनंद घेत होते.

प्रथम फलंदाजी करून विदर्भ संघाने ७ बाद ९१ धावा काढल्या. मात्र या धावसंख्येचा पाठलाग करताना शेष म्हाराष्ट्र संघ फक्त सर्व बाद ५१ धावा करू श्कला. अशा प्रकारे सलग ५ व्या वर्षी विदर्भ हा संघ विजेता ठरला व शेष महाराष्ट्राला उपविजेत्या पदावर समाधान मानावे लागले.

या स्पर्धेचे बक्षिस वितरण सिने अभिनेत्री वर्षा उसगावकर व अखिल भारतीय केमिस्ट असोसिएशन चे अध्यक्ष व आमदार अप्पासाहेब जगन्नाथ शिंदे यांच्या हस्ते पार पडला. या प्रसंगी वर्षा उसगावकर यांनी स्वप्न पाहण्याचा आणि ती साकार करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, दृष्टीहिन असुनही या क्रिकेट पटुंनी दाखविलेले कौशल्य आणि जिद्द यामधुन डोळस व्यक्तींनी प्रेरणा घेण्याची गरज आहे. माणसाचे नाव नव्हे तर माणसाचे कर्तुत्व महत्वाचे आहे. दृष्टीहिन खेळाडुंची मेहनत व कौशल्य अनुंभवल्यामुळे माणसा साठी दृष्टी किती महत्वाची आहे याचे महत्व पटले. माणुस समाजाचे काही देणे लागतो, म्हणुनच सामाजिक कार्यासाठी सहकार्य केले पाहिजे असे प्रतिपादन केले, आणि आपल्या जीवनातील काही मजेदार किस्से सांगितले व त्या पहिल्यांदाच अंध खेळाडुंची क्रिकेट स्पर्धा पाहत असल्याचे ही सांगितले, तसेच अंध खेळाडुंच्या आग्रहास्तव त्यांच्या प्रसिद्ध असलेल्या चित्रपटातील मला परीचे पंख मिळाले हे गाणे गाउन जुन्या आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी अखिल भारतीय केमिस्ट असोसिएशन चे अध्यक्ष आप्पा साहेब जगन्नाथ शिंदे यांनी यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले कि, अंध अपंग समाजातील वंचितांना शिक्षण रोजगार उपलब्द करून देण्यासाठी सहाय करणे हि काळाची गरज आहे, त्याच बरोबर नेत्रदान, अवयव दान हे भविष्यात जगातील सर्वात श्रेष्ठ दान असेल. ते दुस—या वेळेस या स्पर्धेला उपस्थित असल्याचे उपस्थित मान्यवरांना निदर्शनास आणुन दिले. क्रिकेट हा खेळ अंध खेळाडु उत्तम प्रकारे खेळतात याची मला कल्पना आहे. अशा स्पर्धांमधुन भावी खेळाडु तयार होतात म्हणुन संस्थेने हया स्पर्धा अखंडित पणे दर वर्षी घ्याव्यात त्याकरीता माझे व केमिस्ट असोसिएशनचे सहकार्य राहिल अशी ग्वाही दिली. विजेत्या खेळाडुंचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

अंतिम सामन्यात जिंकलेल्या विदर्भ या विजेत्या संघास ११०००रु रोख व ट्रॉफी व शेष महाराष्ट्र या उपविजेत्या संघास ७५००रू चे रोख व ट्रॉफी देवुन त्यांचा गौरव करण्यात आला. मालिकाविराचा पुरस्कार नागपुरच्या अक्षय चौधरीने मिळवला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अध्यक्ष अरूण भारस्कर यांनी केले, राजु भाई व्यास यांनी स्पर्धा घेण्याचा उदेद्श स्पष्ट केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता डॉ. घाटगे, कल्पना पांडे,विजया दबे, दिनेश मुसळे सौ. सपना चांडक लायन्स गायत्री कोष्टी यांनी परीश्रम घेतले.






८. **पांडुरंग भेट व सहलीचे आयोजन** :— सध्याचे युग हे अतिशय धावपळीचे, मनुष्य म्हटले की धावपळ दगदग हि आलीच, मग नोकरी असो अथवा व्यवसाय असो मग त्याला अंध व्यक्ती तरी अपवाद कसा असणार. दररोजच्या धकाधकीच्या जीवनातुन विरंगुळा व्हावा किंवा मुक्तपणे आयुष्याचा आनंद घेता यावा जेणेकरून पुढील काम करण्यासाठी आपल्याला अधिक उत्साह व उर्जा निर्माण व्हावी या हेतुने मागील १२ वर्षांपासुन संस्थेच्या वतीने सहलीचे व पांडुरंग भेटीचे आयोजन करण्यात येते. यावर्षी संस्थेचे हितचिंतक गंगाधर जाधव यांच्या पुढाकाराने २७ डिसेंबर २०१९ रोजी सहलीचे आयोजन केले.

या यात्रेचे प्रस्थान कैलास मठातुन स्वामी समर्थ अक्कल कोट कडे झाले. त्यानंतर पंढरपुर येथे सामुहिकरित्या विठठल दर्शन घेतले. सर्व अंध बांधवांनी रांगेत उभे रहात पांडुरंगाचा जयजयकार करीत दर्शन घेतले. त्यानंतर नरसोबा वाडी, कोल्हापुरची महालक्ष्मी व गणपती पुळे येथे देवदर्शनाबरोबरच येथील समुद्रकिना—यावर असलेल्या बीचवर सहलीस आलेल्या प्रत्येक अंध व्यक्तीने इथे बोटीत जाताना लाटांचा मनमुराद आनंद घेतला. येथील वातावरण अनुभवत असताना प्रत्येक व्यक्तीच्या चेह—यावर उत्साह जाणवत होता सहलीचा संपुर्ण खर्चाचा भार संस्थेचे हितचिंतक श्री. जी. के. जाधव व श्री. गणेश गिते यांनी स्वत: उचलल्याने संस्थेस कोणताही आर्थिक खर्च झाला नाही. मात्र, अंध व्यक्तींना आनंद मिळाला हे मात्र खरे. संस्थेच्या वतीने महासचिव दत्ता पाटील व कोशाध्यक्षा विजया दबे यांनी विशेष परिश्रम घेतले.




९. **मुंबई येथे राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धाचे भव्य आयोजन (सियाराम कप)** :— क्रिकेट हा खेळ आपल्या देशात काय तर जगभर अतिशय लोकप्रिय आहे. म्हणुन त्या खेळाच्या चाहत्यांचा वर्ग देखील मोठया प्रमाणात आहे. मोबाईल मध्ये गेम खेळणा—यापेक्षाही क्रिकेट पाहणा—यांची संख्या जास्त आहे. फरक ऐवढाच आहे कि, मोबाईल गेम टाईमपास म्हणुन खेळतात, मात्र क्रिकेटसाठी छोटयांपासुन उदयोजकांपर्यंत वेळ काढुन आनंद घेतात. जेव्हा भारत आणि पाकिस्तान यांची फायनल मॅच असते तेव्हा तर लोक सुटटी घेउन घरीच मॅचचा आनंद घेणे पसंद करतात. हा सामना म्हणजे क्रिकेट रसिकांसाठी जणु काही मेजवाणीच म्हणावी लागेल. मग क्रिकेटसाठी अंध खेळाडु देखील कसे अपवाद असतील! मगील तीन क्रिकेट विश्वचषकाचा इतिहास बघितला तर अनेक अंध क्रिकेटरांनी आपल्या खेळांची सुरूवात संस्थेने आयोजित केलेल्या स्पर्धेपासुनच केलेली आहे. म्हणुनच अंध खेळाडुंना व्यास पीठ निर्माण करून देण्याची गरज असते, तोच धागा संस्थेने पकडुन मागील १२ वर्षापासुन राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धा आयोजित केल्या. चांगले क्रिकेटर घडले याचे समाधान वाटतेच शिवाय अनेक नवोदितांना संधी देखील मिळते.

यावर्षी या स्पर्धा रोटरी क्लब ऑफ बॉम्बे क्वीन सीटी यांच्या विशेष सौजन्याने व रोटरी क्लब ऑफ ठाणे सेंट्रल यांच्या विशेष सहकार्याने दिनाकं २० जानेवारी ते २२ जानेवारी २०२० रोजी विल्सन जिमखाना मरीन ड्राइव्ह मुंबई आणि इस्लाम जिमखाना मुंबई या मदैानावर अंधांच्या राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धा घेण्यात आल्या. अंधांच्या या राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेचे सलग १३ व्या वर्षी आयोजन करण्यात आले होते. संबधं दशोतनु ८ संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते ज्यामध्ये महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान, पंजाब, उत्तरप्रदेश, दिल्ली व उत्तरांचल यांचा समावेश हातो. लीग बेसिस वर या स्पर्धा खेळविण्यात आल्या.

२० जानेवारी २०१० रोजी सकाळी ९.३० वाजता या स्पर्धेचे उद्घाटन विल्सन जिमखाना येथे माजी क्रिकेटर प्रविण आम्रे, खासदार अरविदंजी सावंत सियाराम गुप्रचे मुख्य रमेशजी पोतदार, सिने अभिनेत्री वर्षा उसगावकर व इतर मान्यवराच्या उपस्थीतीत मोठया दिमाखात संपन्न झाले. स्पर्धा सुरू झाल्याचे प्रतिक म्हणुन बलुन हवेत सोडण्यात आले. माजी क्रिकेटर प्रविण आम्रे व अरविंद सावंत यांनी बॅटिंग करून स्पर्धेचे उद्घाटन केले. यावेळी रोटरी क्लब ऑफ बॉम्बे क्वीन सिटी व रोटरी क्लब ऑफ ठाणे सेंट्रल व संस्थेचे अध्यक्ष अरूण भारस्कर आणी डायरेक्टर अर्जुन मुद्दा यांनी सुदधा सहभागी अंध खेळाडुंना क्रिकेट सामना हा फक्त एक खेळ नसुन तो तुमच्या भविष्याला वळण देणारी व तुमचे स्वप्न पुर्ण करणारी तुम्हाला मिळालेली संधी आहे तेव्हा मिळालेल्या संधीचा फायदा घेवुन तुम्ही जिंकायच आहे. असा मोलाचा संदेश देत स्पर्धा सुरू केली.

पहिला सामना अ गटात मध्यप्रदेश व राजस्थान आणि ब गटात महाराष्ट्र व दिल्ली हया संघात सुरू झाला. रनरेटच्या आधारावर अंतिम सामना दिल्ली व गुजरात या संघात झाला मात्र सलग १२ व्या वर्षी सुद्धा गुजरातने विजेतेपद आपल्याकडे राखुन ठेवले. पारितोषिक समारंभाकरिता यावेळी मंचावर माजी क्रिकेटर संजय बांगर, इस्लामचे अध्यक्ष अब्रहीनी, वामन केंद्रे, माजी आय पी एस अधिकरी मधुकर शिंदे, सियारामचे प्रोप्रा. रमेश पोतदार व गंगाधर उपस्थित होते. यावेळी माजी क्रिकेटर संजय बांगर यांच्या हस्ते विजेत्या संघास २१,०००/— रू व टॉफी देउन गौरविण्यात आले उपविजेत्या संघास १५०००/— रू. व टॉफी देउन गौरविण्यात आले. व अन्य संघांना देखील रोख रक्कम व टॉफी देउन गौरविण्यात आले. मा. पोतदारांनी विश्वचषकात सहभागी झालेल्या ७ खेळाडुंचा १०,०००/— रू.चे पारितोषिक देउन सत्कार केला व सियाराम च्या वतीने हा

कार्यक्रम सातत्याने करण्यात येईल असे त्यांनी आपल्या मनोगतात जाहिर केले. तर मालिकाविराचा पुरस्कार नरेश तुंबडा हयाला देण्यात आला. सर्वोत्तम फलंदाज जिना केसरी व बेस्ट बॉलरचा मानकरी हितेश पटेल व बेस्ट फिल्डर चा उत्तरांचलचा चंदन ठरला. या कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता कोषाध्यक्षा विजया दबे, सपना चांडक, भगवान पवार, वाल्मिक भडांगे, इस्लामचे हानिफ शेख यांनी विशेष सहकार्य केले.




अंध व्यक्ती हि डोळे नसल्याने स्वत:चे जीवन डोळस माणसाप्रमणे जगु शकत नाही. आणि या जगात राहायचे असेल तर अंध माणसाला ही उदार निर्वाह करण्यासाठी आणि स्वत:चे व्यक्ति महत्व सिद्ध करण्यासाठी शिक्षण खुप महत्वाचे आहे आणि हयातच अधिक ज्ञानाची भर टाकुन अंध बांधवांना डोळसांप्रमाणे जीवन जगण्यासाठी वाटा सोप्या करून देत आहोत. इंग्रजी व्याकरणापासुन तर ज्ञानेश्वरी, अट्टल काव्य संग्रह, आरोग्यसंजीवनी, व इयत्ता १० वी चे ब्रेल लिपीतील गाईड पर्यंत आणि त्याही पेक्षा पुढे जावुन डॉट मिनी सारख्या डिव्हाइस सुद्धा आम्ही अंध बांधवांकरीता आणु शकलो. काम्प्युटर रूपी या जगात टिकुन राहवयाचे असेल व शिक्षण हे सर्वांसाठी महत्वाचे आहे, हे लक्षात घेवुनच या वर्षी संस्थेने जास्त भर शिक्षणावर दिलेला आहे.

चिखलातुन जसे कमळ उगवते, त्याप्रमाणेच आमच्या संस्थेचा उदय झाला. संस्थेने आजपर्यंत खुप कसरतीच्या अवघड वाटा पार करीत अंधांच्या कल्याणासाठी अथक परीश्रम करत आजपर्यंत जे यश संपादन केले आहे त्याचा मला खुप अभिमान आहे. संस्थेने केलेल्या या कार्याची व्यापक उंची हेच संस्थेने कमविलेले एक प्रमाणपत्र आहे. आमच्या संस्थेने केलेला हा प्रवास मात्र कितीतरी अंधांचे जीवन प्रकाशमय करून गेला. मग ते शिक्षण असो, वा स्वंयंरोजगार असो, वैवाहिक जीवन असो किंवा कला क्रिडाक्षेत्र असो, अशा प्रत्येक ठिकाणी संस्थेने भरीव काम केलेले आहे. असे असले तरी ही आपण दिलेले योगदान माझी संस्था नाकारू शकत नाही. महेंद्रा कोटक, सियाराम ग्रुप, भारत पेट्रोलियम विविध कार्पोरेट बॅका तसेच रोटरी क्लब, लायन्स क्लब, यांसारख्या सेवाभवी संस्था यांचे तर योगदान मिळालेच आहे, परंतु अहमनगरचे नरेंद्र फिरोदिया, उल्हास देबडवार, केशव वरखेडकर, कृष्णकुमार गोयल अशा काही व्यक्ती संस्थेच्या आधार स्तंभ आहे कि, ज्यांचे योगदान अगदी संस्थेच्या सुरूवाती पासुनच आम्हाला मिळाले आहे. तसेच प्रसारमाध्यमांनीही संस्थेच्या कार्याची दखल घेतल्याने संस्था अनेकांपर्यंत पोहोचु शकली अशा ज्ञात अज्ञातांचे पुनश्च एकदा आभार!

भविष्यात संस्थेला एक मदत पुन:र्वसन केंद्र सुरू करण्याचा मानस असुन उशीरा अंधत्व आलेल्या दृष्टीबाधित व्यक्तींना त्याचा फायदा होईल. आणि मला खात्री आहे कि, आपल्या सारख्या हितचिंतकामुळे मी बघितलेले स्वप्न हे स्वप्न न राहता त्याची कृती होईल.

एकंदरीतच या वर्षभरात ९ उपक्रम राबविले गेले. हे उपक्रम संख्येने कमी असले तरी राबविले ते अंधांच्या हिताचे व भरीव आहे हे सांगता येईल. अशा हया आम्ही लावलेल्या एका छोटया रोपटयाचे रूपांतर मोठया वृक्षात झालेले आहे आणि त्याचा निवारा अनेक दृष्टीहिन व्यक्तींना मिळत असल्याचे आपण अहवालात वाचलेच आहे.

धन्यवाद !                महासचिव दत्तात्रेय शंकर पाटील.